आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१ जानेवारी २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- कृत्रिम बुद्धिमत्ता ही भारतीय अर्थव्यवस्थेची चालक म्हणून पुढं येत असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

- विकसित भारत जी-राम जी’ योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं केंद्रीय कृषिमंत्र्यांची ग्वाही

- देशातली पहिली ‘वंदे भारत स्लीपर ट्रेन’ लवकरच सुरू होणार अशी रेल्वेमंत्र्यांची घोषणा

- जीएसटीच्या डिसेंबर महिन्यातल्या संकलनात गेल्या वर्षीच्या डिसेंबरच्या तुलनेत ६ पूर्णांक १ दशांश टक्के वाढ

**आणि**

- नववर्षाच्या पूर्वसंध्येला स्वित्झर्लंडमध्ये बारला लागलेल्या आगीत मोठी जीवितहानी झाल्याची भीती

**<><><><><>**

जगातली तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं भारत वेगानं प्रगती करत असून, कृत्रिम बुद्धिमत्ता ही भारतीय अर्थव्यवस्थेची चालक म्हणून पुढं येत आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज राष्ट्रपती भवनात ‘सोर’, अर्थात कृत्रिम बुद्धिमत्ता सज्जतेसाठी कौशल्य कार्यक्रमांतर्गत आयोजित विशेष कार्यक्रमात बोलत होत्या. कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तंत्रज्ञान नसून भारतात सकारात्मक बदल आणण्याची संधी आहे, असं त्या म्हणाल्या..

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती***

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान आणि राज्यमंत्री जयंत चौधरी यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

'विकसित भारत जी-राम जी' योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. ते आज अहिल्या नगर जिल्ह्यात राहाता तालुक्यातल्या लोणी बुद्रुक इथं 'विकसित भारत जी-राम जी' अभियानांतर्गत आयोजित विशेष ग्रामसभेत बोलत होते.

***होल्ड... बाईट- शिवराज सिंह चौहान***

या नव्या योजनेत, लवचिक धोरण स्वीकारलं असून, ज्यावेळी शेतीच्या पीक पेरणी-कापणी वगैरे कामांचा हंगाम असेल, त्यानुसार वर्षातले ६० दिवस या योजनेची कामं बंद राहतील. त्यामुळे शेतीकामासाठी मजूर उपलब्ध होतील आणि शेतकऱ्यांचं नुकसान टळेल. दुसरीकडे मजुरांना त्यांच्या घामाचा दाम वेळेवर मिळण्यासाठी या योजनेत अत्यंत कडक तरतुदी केल्या आहेत. काम संपल्यापासून एका आठवड्याच्या आत किंवा जास्तीत जास्त १५ दिवसांत मजुरी थेट बँक खात्यात जमा होईल. प्रशासकीय कारणानं १५ दिवसांत पैसे मिळाले नाहीत, तर मजुराला ५ शतांश टक्के दरानं व्याजासह रक्कम देण्याची तरतूद यात आहे. तसंच, काम मागूनही प्रशासनाला रोजगार देता आला नाही, तर 'बेरोजगारी भत्ता' देणं यापुढे कायद्यानं अनिवार्य असेल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशातली पहिली 'वंदे भारत स्लीपर ट्रेन' लवकरच सुरू होणार असून, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या काही दिवसांत या गाडीला हिरवा झेंडा दाखवतील, अशी घोषणा रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली. ते आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत बोलत होते. पहिली वंदे भारत स्लीपर ट्रेन गुवाहाटी आणि कोलकाता दरम्यान धावेल, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. स्वदेशी बनावटीच्या वंदे भारत स्लीपर ट्रेनची हाय-स्पीड चाचणी नुकतीच पूर्ण झाली असून, या गाडीला १६ डबे

आहेत, आणि एक ते दीड हजार किलोमीटर इतक्या लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी ती विकसित करण्यात आली आहे, असंही वैष्णव यांनी सांगितलं. १५ ऑगस्ट २०२७ रोजी देशाला पहिली बुलेट ट्रेन मिळेल, असंही त्यांनी जाहीर केलं. सुरत ते बिलिमोरा हा पहिला टप्पा आधी खुला होईल, त्यानंतर वापी ते सुरत हा टप्पा खुला होईल, असंही वैष्णव म्हणाले.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान डीआरडीओने विकसित केलेल्या शस्त्रास्त्रांनी बजावलेली निर्णायक भूमिका ही राष्ट्रीय हितांचं रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचा पुरावा असल्याचं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज केलं. नवी दिल्लीतल्या डीआरडीओ मुख्यालयात ६८व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सशस्त्र दलांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करून भारताच्या स्वदेशी क्षमता बळकट केल्याबद्दल त्यांनी डीआरडीओचं कौतुक केलं. तसंच, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी घोषित केलेल्या सुदर्शन चक्र निर्मितीत डीआरडीओ महत्त्वाची भूमिका बजावेल असा विश्वास सिंह यांनी व्यक्त केला. पुढच्या दशकात संपूर्ण हवाई संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी त्यातले महत्त्वाचे घटके संरक्षण प्रणालीसज्ज करण्याची जबाबदारी डीआरडीओवर असल्याचंही ते म्हणाले.

**<><><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कराच्या डिसेंबर महिन्यातल्या संकलनात गेल्यावर्षीच्या डिसेंबरच्या तुलनेत ६ पूर्णांक १ दशांश टक्क्याची वाढ झाली आहे. यंदा जीएसटी संकलन १ लाख ७५ हजार कोटी रुपये इतकं झालं. गेल्या वर्षी हे प्रमाण १ लाख ६४ हजार रुपये इतकं होतं. डिसेंबर २०२५ मध्ये केंद्रीय जीएसटी

संकलन ३४ हजार २८९ कोटी रुपये, तर राज्य जीएसटी संकलन ४१ हजार ३६८ कोटी रुपये इतकं होतं.

**<><><><><>**

भारत-ऑस्ट्रेलिया आर्थिक सहकार्य आणि व्यापार करारानुसार भारताच्या निर्यातीवर आजपासून ऑस्ट्रेलियात कोणताही कर लागणार नाही. यामुळे भारतातल्या रत्नं, अलंकार, वस्त्रं, चामडं, पादत्राणं, अन्नपदार्थ, वैद्यकीय उपकरणं आणि ऑटोमोबाईल क्षेत्रांना मोठा फायदा होणार आहे. तर, ऑस्ट्रेलियातून भारतात येणाऱ्या सुमारे ७० टक्के वस्तूंवरचं आयात शुल्क कमी किंवा रद्द होणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी काहीच दिवसांपूर्वी ही घोषणा केली होती.

**<><><><><>**

२०२५ हे वर्षं भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वाचं ठरलं. या वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकांची कमाई तर झालीच पण खेळांमध्ये विक्रमी सरकारी गुंतवणूक, महत्वाच्या धोरणात्मक सुधारणा आणि विस्तारित पायाभूत सुविधांनी भारतीय क्रीडा विश्वात नव्या युगाचा पाया रचला. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

***होल्ड... व्हीसी-***

*(क्रीडाविषयक धोरणांमध्ये झालेल्या सुधारणांचा सकारात्मक परिणाम २०२५मध्ये दिसून आला. या वर्षात विविध स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. भारतीय महिला क्रिकेट संघानं आयसीसी विश्वचषक जिंकला. अंध महिला क्रिकेट संघानेही टी-२० विश्वचषकावर नाव कोरलं. भारतीय खेळाडूंनी बॉक्सिंग कप स्पर्धेच्या अंतिम दिवशी नऊ सुवर्णपदकांची कमाई केली. आशियाई युवा क्रीडा स्पर्धेत भारतानं ४८ पदकं जिंकून आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. भारतीय पुरुष क्रिकेट संघाने न्यूझीलंडचा पराभव करून आयसीसी*

*चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली. पहिला खो-खो विश्वचषक भारतीय महिला संघाने पटकावला. आशिया चषक हॉकी स्पर्धेचं विजेतेपदही यंदा भारताने मिळवलं. पॅरा तिरंदाजी स्पर्धेत शीतल देवी हिने तर फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत दिव्या देशमुख हिने आपलं नाणं खणखणीत वाजवलं. तळागाळातल्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी यंदाही खेलो इंडिया स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.)*

**<><><><><>**

प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी आज दोन वेगवेगळ्या शैलींमधल्या वंदे मातरम गीतांचं अनावरण केलं. हे गीत फक्त स्वातंत्र्यलढ्याचं गीत नसून, देशाच्या एकतेचं आणि अखंडतेचं प्रतीक आहे, असं प्रतिपादन द्विवेदी यांनी यावेळी केलं. आकाशवाणी अशा एकंदर २५ शैलींमध्ये या गीताचं सादरीकरण करणार आहे.

**<><><><><>**

९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला आज साताऱ्यात सुरुवात झाली. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी आणि मावळत्या अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांच्या हस्ते ध्वजारोहण, तसंच ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन झालं. संमेलनाचं औपचारिक उद्घाटन उद्या ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील समारंभाला उपस्थित राहतील.

**<><><><><>**

नववर्षाच्या पूर्वसंध्येला स्वित्झर्लंडमध्ये एका बारला लागलेल्या आगीत मोठी जीवितहानी झाल्याची भीती आहे. या दुर्घटनेत सुमारे १०० जण जखमी झाले आहेत. त्यापैकी बहुतेकांची प्रकृती गंभीर आहे. मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरू असून आत्ताच नक्की आकडा सांगता येणार नाही, असं स्थानिक पोलीस

अधिकाऱ्यांनी वार्ताहरांना सांगितलं. आगीचं कारण अद्याप स्पष्ट झालेलं नाही. मात्र, हा कोणताही हल्ला नाही, असं अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे.

//<><><><><>//